सा.प्रगत भारत
वृत्तपत्रकाचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा वार्षिक ५००/-रू दोन वर्षे-१०००/- रुपये अधिक माहिती वसंपर्क- ९८६०८७७७८९दररोजच्या ताज्या बातम्या पहा.. खालील वेब पोटर्स न्युज ..www. pragatbhart.com

साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789




● वर्ष:१८ ● अंक क्र. ४३ ● साप्ताहिक ● मंगळवार दि. १९ ते २५ मे २०२६ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ● RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००

## उपवर्गीकरण करण्या अगोदर अनुसूचित जातीच्या सर्व प्रतिनिधींना विश्वासात घेऊनच शासनाने निर्णय घ्यावा.. मुंबई येथे(रोसा)च्या बैठकीमध्ये चर्मकार समाजाच्या सामाजिक व राजकीय प्रतिनिधींचे मत




**पुर्व मुंबई:निर्मल क्लब जुना हॉल चिंचपोकळी येथे अनुसूचित जाती उपवर्गीकरण याबाबत रोसाच्या वतीने आयोजित बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना माजी समाजकल्यान मंत्री बबनराव घोलप,तसेच यावेळी संजयजी सावकारे,वस्त्रोद्योग मंत्री,आमदार किसनराव वानखेडे,आमदार अशोकराव माने,रोसाचे अध्यक्ष प्रा.डॉ. विठ्ठलराव दांडगे,उपाध्यक्ष हेमलाल वाखरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते**

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**मुंबई:उपवर्गीकरण करण्या अगोदर अनुसूचित जातीच्या सर्व प्रतिनिधींना विश्वासात घेऊन व जनगणना २०२६ नुसार नागरिकांच्या होत असलेल्या नोंदीनुसार राज्य शासनाने निर्णय घ्यावा..मुंबई येथे (रोसा) बैठकीमध्ये चर्मकार समाजाच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधींचे मत अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई येथे रोसाची ऑफिसर्स व पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.**

बैठकीमध्ये रोसाचे अध्यक्ष प्रा.डॉ. विठ्ठलराव दांडगे यांनी उपस्थित समाजबांधवांचे स्वागत केले. प्रा.डॉ. विठ्ठलराव दांडगे यांनी आपल्या प्रास्ताविकात अनुसूचित जाती उपवर्गीकरणाबाबत अ,ब,क,ड, यांच्याबद्दल सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजयजी सावकारे,वस्त्रोद्योग मंत्री,महाराष्ट्र शासन,हे होते. रोसाचे उपाध्यक्ष हेमलाल वाखरे यांनी ही उपवर्गीकरणा यावाबत विचार मांडले यामध्ये बोलताना त्यांनी सांगितले की,असुसूचित जातीच्या होत असलेल्या आरक्षण उपवर्गीकरण हे भविष्यात समाजाला धोकादायक ठरत असून,यामुळे समाजाचे मोठे नुकसान होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी आपापली मते मांडली.उपवर्गीकरणाबाबत शासन स्तरावर सुरु असलेल्या प्रक्रियेत अनुसूचित जातीमधील सर्व घटकांचे म्हणणे ऐकून घ्यावे. मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली त्रिसदस्यीयसमितीवर हरकती व सूचना सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.न्या अनंत बदर (निवृत्त)समितीचा अहवाल सर्वासाठी उपलब्ध करुन द्यावा व त्यावर खुली चर्चा व्हावी. सर्व ५९ जातींच्या प्रतिनिधींची चर्चा करावी.जनगणनेच्या आकडेवारीचा विचार करावा. निधी वाटपात लोकसंख्येच्या प्रमाणात व सामाजिक न्यायाचा विचार होणे आवश्यक आहे.अनुसूचित जातीसाठी एकूण १३ टक्के असलेले आरक्षण ५९ जातींमध्ये अ,ब, क, ड गट करुन विभागण्याचा प्रस्ताव आहे. २०२६ ची जनगणना झाल्यानंतर उपलब्ध आकडेवारीच्या आधारे निर्णय घेतल्यास अधिक स्पष्टता येईल.

मुंबई येथील बैठकीला आमदार किसनराव वानखेडे,उमरखेड, आमदार अशोकराव माने, हातकणंगले,कोल्हापूर,माजी समाजकल्याणमंत्री व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप, सुरेखा लांबतुरे,माजी सदस्या अनुसूचित जाती आयोग भारत सरकार सुरेश पाखरे,मुख्य अधिकारी मेट्रो ठाणे,गायकवाड, आयकर अधिकारी,डॉ. सुधीर मेढेकर,जॉईट डायरेक्टर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,डॉ.नरेश विश्वनाथ वाघमारे,कायदा विभाग,पुणे विद्यापीठ,हेमंत वानेरे,जनरल सेक्रेटरी रोसा,संजय सोनवणे, दत्तात्रय गोतीसे,नाशिक,संजय धनशेट्टी,रोसा सोलापूर जिल्हाअध्यक्ष,रमेशखाडे, विश्वनाथ व्हनकोरे,सी.के.जाधव माजी सहसचिव,डॉ.अशोक लांबतुरे आदी उपस्थित होते.

adv

## नीट परीक्षेत मोठा बदल! पुढील वर्षापासून परीक्षा होणार ऑनलाईन;पेपरफुटीनंतर-केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची घोषणा

**पुणे:**देशभरात गाजलेल्या नीट पेपर फुटी प्रकरणानंतर केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्था आता पूर्णपणे कृती मोडमध्ये आले आहेत. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या नीट परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मोठी घोषणा केली आहे.पुढील वर्षापासून नीट पदवीपूर्व परीक्षा संगणक आधारित म्हणजेच पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पेपरफुटीच्या धक्कादायक प्रकारानंतर विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी परीक्षा प्रक्रियेत मोठे बदल करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

२१ जूनला परीक्षा; विद्यार्थ्यांना अतिरिक्त वेळयंदाची नीट परीक्षा २१ जून रोजी दुपारी २ ते ५.१५ या वेळेत पार पडणार आहे.विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना यावेळी १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच, परीक्षेची प्रवेशपत्रे १४ जूनपर्यंत उपलब्ध करून दिली जातील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.पेपर फुटीनंतर राष्ट्रीय परीक्षा संस्थेवर संशयाची सुईनीट पदवीपूर्व २०२६ पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक माहिती समोर येत असून,प्रश्नपत्रिका थेट राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या अंतर्गत यंत्रणेतूनच फुटल्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात संस्थेतील काही अधिकारी



किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का,याची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्यात आली आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरवणारी ही परीक्षा ३ मे रोजी पार पडली होती. मात्र राजस्थान पोलिसांच्या विशेष तपास पथकाच्या तपासात गंभीर बाबी उघड झाल्यानंतर ही परीक्षा अखेर रद्द करण्यात आली.

**परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधी पेपर मोबाईलवर!**

तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार,परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधीच प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर पोहोचली होती.१ मे रोजीच पेपर फुटला होता आणि तो संदेशवहन गट तसेच मोबाईल संदेश माध्यमातून मोठ्या प्रमाणात पसरवण्यात आल्याचे उघड झाले आहे.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ही मूळ प्रश्नपत्रिका 'अंदाज प्रश्नपत्रिका' असल्याचे भासवत समाजमाध्यमांवर फिरवण्यात आली होती, त्यामुळे सुरुवातीला कोणालाही संशय आला नाही. राजस्थानातील वसतिगृहांमध्ये पेपर पोहोचल्याचा संशय राजस्थानमधील सीकर परिसरातील अनेक वसतिगृह आणि भाडेतत्त्वावरील निवासस्थानी राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत हा पेपर परीक्षेच्या दोन दिवस आधीच पोहोचल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या संपूर्ण प्रकरणात कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक व्यवहारांचाही संशय व्यक्त करण्यात येत असून, तपास यंत्रणांचे लक्ष आता राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या अंतर्गत व्यवस्थेकडे वळले आहे. पेपरफुटीमागे नेमके कोण आहे, याचा शोध घेण्यासाठी विविध यंत्रणा तपास करत आहेत.''परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित करणार''राष्ट्रीय परीक्षा संस्था ही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थापन झालेली संस्था असून ती देशातील जवळपास एक कोटी विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेत असल्याचे धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले. परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित,पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी सुधारणा करण्यात येत असून,ऑनलाईन परीक्षेमुळे पेपरफुटीसारख्या घटनांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल,असा विश्वास केंद्र सरकारने व्यक्त केला आहे.

## विधान परिषदेच्या १६ जागांसाठी मतदान,१८ जून २०२६ रोजी मतदान

**पुणे:** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १६ जागांसाठी निवडणुकांची घोषणा निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.१८) केली. या सर्व जागांसाठी १८ जून २०२६ रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी नागपूर मतदारसंघातील पोटनिवडणूकही होणार आहे. निवडणूक जाहीर होताच संबंधित भागांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणुकीचे वेळापत्रक२५ मे २०२६-अधिकृत अधिसूचना जारी १ जून २०२६-नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २ जून २०२६-अर्जांची छाननी४ जून २०२६-उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख१८ जून २०२६-मतदान (सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत)२२ जून २०२६-मतमोजणी आणि निकालया १६ मतदारसंघांमध्ये होणार मतदानसोलापूर,अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड,यवतमाळ,पुणे,भंडारा-गोंदिया,रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती,उस्मानाबाद-लातूर-बीड,परभणी-हिंगोली, धाराशिव-जालना या मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

या मतदारसंघांचे प्रतिनिधित्व यापूर्वी प्रशांत परिचारक,चंद्रभाई पटेल,अंबादास दानवे यांसारख्या दिग्गज नेत्यांनी केले होते. नागपूरमध्येही पोटनिवडणुकीची घोषणा नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद जागेसाठी पोटनिवडणुकीचीही घोषणा करण्यात आली आहे.भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे हे नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभेसाठी निवडून गेल्यानंतर त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.त्यानंतर ही जागा रिक्त होती.मात्र,आवश्यक निकष पूर्ण न झाल्यामुळे ही पोटनिवडणूकही रखडली होती. त्यानंतर आता नागपूरमध्येही १८ जूनलाच मतदान होणार आहे.रखडलेल्या निवडणुकांना अखेर हिरवा कंदील महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १६ सदस्यांचा कार्यकाळ २०२२ ते २०२५ या कालावधीत संपला होता.मात्र अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत,प्रशासकीय अडचणी आणि मतदार याद्यांशी संबंधित निकष पूर्ण न झाल्यामुळे निवडणुका वेळेत घेता आल्या नव्हत्या.आयोगाच्या नियमांनुसार, एखाद्या मतदारसंघात किमान ७५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे आणि किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असणे आवश्यक असते. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आता हे सर्व निकष पूर्ण झाल्याची माहिती आयोगाला दिल्यानंतर निवडणुकीची घोषणा करण्यात आली.

## महाराष्ट्र मधील बोगस दातांच्या डॉक्टरांना बसणार आळा; महाराष्ट्र राज्य दंत परिषदेकडून मराठी नोंदणी प्रमाणपत्रे जारी

**मुंबई:महाराष्ट्र राज्य दंत परिषद (एमएसडीसी)यांनी राज्यातील दंतवैद्यकीय सेवांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व व नियामक अनुपालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने नो युअर डेंटल प्रॅक्टिशनर (केवायडी) हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.या उपक्रमाचा मुख्य हेतू राज्यात बेकायदेशीर,अप्रमाणित व नोंदणीविना चालणाऱ्या दंतप्रैक्टिसला आळा घालणे हा आहे.**

या उपक्रमांतर्गत परिषदे मार्फत प्रत्येक नोंदणीकृत दंतचिकित्सकाला एक अधिकृत केवायडी शीट प्रदान करण्यात येत आहे.या शीटवर समाविष्ट असलेल्या अद्वितीय क्यूआर कोडद्वारे सर्वसामान्य नागरिक,रुग्ण व संबंधितांना दंतचिकित्सकाची नोंदणी स्थिती,वैधता,स्पेशलिटी व इतर आवश्यक तपशील त्वरित व विश्वसनीय पद्धतीने पडताळता येणार आहे. यामुळे रुग्णांना उपचारासंदर्भात माहितीआधारित निर्णय घेणे सुलभ होऊन दंतसेवांबाबतचा सार्वजनिक विश्वास अधिक दृढ होईल तसेच बोगस दंतवैद्य शोधणे सोपे होईल.परिषदेकडून सर्व नोंदणीकृत दंतचिकित्सकांना निर्देश देण्यात येत आहेत की,ही केवायडी क्यूआर शीट त्यांच्या दवाखान्याच्या प्रवेश द्वारावर अथवा प्रतीक्षागृहात स्पष्टपणे व ठळकपणे प्रदर्शित करावी.

**व्यावसायिक प्रतिष्ठा, विश्वासार्हते साठी महत्त्वपूर्ण पाऊल**

महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे यांनी नमूद केले की, हा उपक्रम हा सार्वजनिक हितसुरक्षेसाठी, दंत व्यवसायातील शुचित्व राखण्यासाठी तसेच व्यावसायिक प्रतिष्ठा व विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.यासोबतच,परिषदेमार्फत दि. १ मे २०२६ पासून इंग्रजीसह मराठी नोंदणी प्रमाणपत्रे जारी करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात येत आहे.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे हस्ते या नवीन नोंदणी प्रमाणपत्राचे विमोचन करण्यात आले तसेच हँडबूक ऑफ प्राक्टिशनर गाइडलाइन्स या महाराष्ट्र स्टेट डेंटल कॉन्सिलच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. राज्यात हा असा उपक्रम करणारी स्टेट डेंटल कौन्सिल ही पहिली वैद्यकीय परिषद आहे.डॉक्टरांसाठी पुस्तिका मार्गदर्शकथ पुस्तिकेत दंतवैद्यक व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांसाठी उपयुक्त माहिती आहे. यामध्ये सध्याचे दंतवैद्यक व्यवसायासंदर्भातील कायदे, नैतिक आचरण,क्लिनिक सुरू करताना आवश्यक कागदपत्रे व परवानगी,रुग्णांची माहिती, संमतीपत्र,आपत्कालीन व्यवस्थापन, औषधींचा वापर, आदर्श प्रिस्क्रीप्शन,प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम इत्यादी सर्व माहिती उपलब्ध आहे.

## यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कबीर कांबळे यांचा पत्रकारांकडून सन्मान



**पिंपरी:-** कबीर राहुल कांबळे यांनी देशातील सर्वोच्च परीक्षा,केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी),उत्तीर्ण करून पिंपरी चिंचवड शहराला गौरव मिळवून दिला आहे. त्यांनी १२५ वा क्रमांक मिळवून आयएफएस (वनसेवा) साठी निवड झाली आहे.

पिंपरी चिंचवडच्या पत्रकारांनी कांबळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची एक पुस्तक,एक शाल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी उपस्थित असलेल्या त्यांच्या आई-वडिलांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब ढसाळ, संतलाल यादव,बाबू कांबळे,अविनाश कांबीकर,दादाराव आढाव,दिलीप देहाडे,भिमराव बरकडे,युनूस खतिब आणि इतर अनेक पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित होते.

ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

## संपादकीय

### महाराष्ट्रामधील कठोर कायद्याची धाक केव्हा वाढणार..?

देशामधील होत असलेल्या विविध राज्यामधील अत्याचारामध्ये आपण जर पाहिले एक नजर टाकली तर महाराष्ट्रमधील विशेष शहरामधील वाढती लोकसंख्या व विविध प्रकारचे होत असलेले गुन्हे यांचा आज गांभीयांन विचार करणे गरजेच आहे.महाराष्ट्रात दर ५३ मिनिटांनी एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव आहे. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे, तर अधुऱ्या शक्ती कायद्यामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळे ही.पुण्याच्या नसरापूरमध्ये साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार होऊन तिची हत्या झाली.तिच्यानंतर पर्वतीत नऊ वर्षांच्या मुलीवर आजोबाने हात टाकला.चाकणमध्येही पुन्हा तशीच घटना.हे महाराष्ट्र दिनाच्याच आठवड्यातले चित्र आहे.पण या चित्राच्या पार्श्वभूमीत एक काळोखा कोपरा आहे,जिथे राजकारण चालू आहे.थंड,निगरगट्ट,स्वार्थी राजकारण.शक्ती कायदा राजकारणात अडकला.२०२१ मध्ये महाराष्ट्र विधानसभेने शक्ती कायदा एकमताने मंजूर केला. बलात्कार,बालकांवरील अत्याचार, ॲसिड हल्ले यांसाठी २१ दिवसांत चौकशी, खटला आणि शिक्षा हा कायद्याचा गाभा होता. आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर बनवलेला हा कायदा देशातील सर्वाधिक कठोर ठरला असता. मग हा कायदा कुठे आहे आज? केंद्र सरकारच्या धूळखात पडलेल्या फाइलींमध्ये. तीन वर्षांहून अधिक काळ.फौजदारी कायदा हा समवर्ती सूचीत येतो. त्यामुळे राज्याने पारित केलेल्या अशा कायद्यांना केंद्राची अंतिम मंजुरी लागते हे घटनात्मक सत्य आहे. पण घटनेने ही प्रक्रिया अडवण्यासाठी दिलेली नाही, ती समन्वयासाठी दिली आहे. केंद्राने शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? एकही तांत्रिक उत्तर आजपर्यंत दिले गेले नाही. कारण अडथळा तांत्रिक नव्हता. जो अडथळा होता तो राजकीय होता. महाविकास आघाडी सरकारने बनवलेला कायदा केंद्रातील भाजपने मंजूर करायचा हे त्यांना रुचले नाही. एखाद्या विरोधी सरकारच्या यशाला मुद्राकन द्यायचे नाही, हा पक्षाचा अलिखित नियम. या नियमाची किंमत नसरापूरच्या त्या चिमुरडीने जीव देऊन चुकवली. हे आकलन कठोर वाटते का? तर विचार करा, आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायदा केंद्राने किती वेळात मंजूर केला होता? त्या राज्यात भाजपशी मैत्रीपूर्ण सरकार होते. महाराष्ट्रात शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी असलेले सरकार होते. हा योगायोग नाही. हे राजकीय गणित आहे. हे गणित सुटले तेव्हा काय झाले? महाराष्ट्रात सत्तांतर झाले, महाविकास आघाडी गेली, महायुतीचे सरकार आले आणि भाजपचा मुख्यमंत्री आला. आता शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? उत्तर शून्य असायला हवे होते. पण तरीही कायदा लटकतच राहिला. तेव्हा बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्यांवर अत्याचार झाला, राज्य पेटले, पुन्हा आश्वासने दिली. मग २०२५ मध्ये एक नवे 'सुधारित शक्ती विधेयक' आले. भारतीय न्याय संहितेत फेरफार करत. हे विधेयक म्हणजे काय होते? मूळ शक्ती कायद्याची सावली. त्यातील दोन तरतुदी डिजिटल छळाविरोधात आणि ॲसिड हल्ला पीडितेच्या गोपनीयतेसाठी इतक्याच घेतल्या.बाकी कठोर तरतुदी,२१ दिवसांची वेळमर्यादा,जलदगती यंत्रणा हे सगळे भारतीय न्याय संहितेमध्ये आधीच आहे असे सांगून सोडण्यात आले. पण जर भारतीय न्याय संहितेत पुरेशा तरतुदी आहेत,तर नसरापूरमध्ये न्याय का मिळत नाही?जर फास्ट ट्रॅक कोर्ट आहे,तर पुणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहा हजारांहून अधिक पोक्सो प्रकरणे प्रलंबित का होती? उत्तर साधे आहे.कायदा असणे आणि कायदा चालवणे यात फरक आहे.हा फरक दूर करण्याची इच्छाशक्ती या सरकारकडे नाही.प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे?नसरापूरचा आरोपी भीमराव कांबळे हा यापूर्वी दोनदा तत्सम गुन्ह्यांत अटक झालेला होता. दोन्ही वेळा पुराव्याअभावी सुटला. या माणसाला तिसऱ्यांदा संधी मिळाली ती कशामुळे? तपासाच्या सुमार दर्जामुळे, न्यायालयीन विलंबामुळे आणि पीडितांना वेळेत न्याय न मिळाल्यामुळे. हे तिन्ही प्रश्न शक्ती कायद्याच्या तरतुदींनी सोडवले असते. आता सत्ताधारी म्हणतील की, भारतीय न्यायसंहितेमध्ये तरतुदी आहेत,पोक्सो आहे,एसआयटी स्थापन केली आहे. पण हे सगळे घटना घडल्यानंतर. प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे? पूर्वसावधगिरी कुठे आहे? सत्य हे आहे की,या सरकारला घटनेनंतर उद्रेक आवरण्यात रस आहे, प्रश्न सोडवण्यात नाही. एसआयटी हे संताप झाकणारे झाकण आहे,उपाय नाही. जमाव रस्त्यावर उतरतो, पोलीस स्टेशनसमोर जमतो, आरोपीला आमच्या स्वाधीन करा असे ओरडतो. हे दृश्य लोकशाहीसाठी धोकादायक आहे. या धोक्याचे मूळ कारण जनतेत नाही. जेव्हा व्यवस्था न्याय देत नाही, तेव्हा माणूस न्याय विकत घेण्याचा किंवा स्वत: करण्याचा प्रयत्न करतो.हा समाजशास्त्राचा नियम आहे. त्यामुळे अत्याचाराच्या घटनांना जबाबदार धरायचे असेल तर ते शक्ती कायदा अडवणाऱ्यांना धरावे लागेल.आजपर्यंत महाराष्ट्रात एक जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या सोळा महिन्यांत ९३ हजार ३९० पोक्सो गुन्हे दाखल झाले. दर ५३ मिनिटांनी एक अत्याचार होतो. ही आकडेवारी पाहून केवळ गुन्हेगारांना दोष देता येणार नाही. ही आकडेवारी जी व्यवस्था कायदे बनवते, ते अडवते, त्यांची अंमलबजावणी करत नाही आणि प्रत्येक घटनेनंतर केवळ निषेधाचे नाटक करते त्यांनाही दोषी धरते. नसरापूरची चिमुरडी गेली. तिला परत आणणे कोणाला शक्य नाही. पण पुढची नसरापूर टाळणे शक्य आहे. जर इच्छाशक्ती असेल तर ते शक्य आहे. अन्यथा बालकांच्या जीवाचे रक्षण करण्याऐवजी सरकार राजकीय श्रेयाच्या लढाईत मग्न राहिले, तर त्याची इतिहासात नोंद होईल.इच्छाशक्तीचा प्रश्न एसआयटी स्थापन होते, निषेध होतो, आश्वासने दिली जातात, पण दर ५३ मिनिटांनी महाराष्ट्रात एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव बदलत नाही. शक्ती कायद्याचे उदाहरण सांगते की, महाराष्ट्रात राजकीय इच्छाशक्ती असेल तर कायदे बनतात, पण ते प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच त्यांना राजकारणाची चाळणी लागते. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे तर एका अधुऱ्या कायद्यामुळे, एका प्रलंबित न्यायामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही.

## जेष्ठ नागरिक विचार मंचाचा उपक्रम;चर्मकार समाजातील समाजसेवेसाठी कार्यरत डॉक्टरांचा ७ जून रोजी अकोला येथे गौरव

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**अकोला:अकोला शहरातील रहिवासी असलेले चर्मकार समाजातील डॉक्टर जे अकोल्यात व इतरत्र वैद्यकीय सेवा देतात तसेच इतरत्र ठिकाणचे रहिवासी असलेले अकोल्यात सेवा देतात, अशा सेवाभावी डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक विचार मंच, अकोला यांच्या वतीने "डॉक्टर्स सन्मान-सत्कार सोहळा २०२६"चे आयोजन करण्यात आले आहे.** हा सोहळा रविवार, ७ जून रोजी सकाळी ९.३० वाजता प्रमिलाताई ओक सभागृहात होणार आहे.या कार्यक्रमात ॲलोपॅथी,आयुर्वेद,होमिओपॅथी,दंतचिकित्सा तसेच फिजिओथेरपी अशा विविध वैद्यकीय शाखांमध्ये कार्यरत असलेल्या नोंदणीकृत डॉक्टरांचा सन्मान करण्यात येणार आहे. वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार असून,समाजासाठी नि:स्वार्थपणे कार्य करणाऱ्या डॉक्टरांच्या योगदानाचा गौरव करण्याचा आयोजकांचा मानस आहे.मानवी जीवन वाचविण्याच्या पवित्र कार्यात योगदान देणाऱ्या,रुग्णांच्या वेदनेत आधार बनणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान करणे ही समाजाची नैतिक जबाबदारी असल्याची भावना विचारमंचाने व्यक्त केली आहे. उपक्रमात सहभागी होण्यासाठी मान्यवर डॉक्टरांची माहिती द्यावी, असे आवाहन आयोजक मंडळाने केले आहे.संपर्क-रामभाऊ ताजने (८३९०७४५०४२),प्रा.गजानन पदमणे (९४२२९६०३०३),मधुसूदन गव्हाळे (९७६४७७३३६३), प्रभाकर रेवस्कर (९४२०८३९५९४),गजानन काकडे (९४०४८४८८५)

## उन्हाळ्यातील वाढत्या उष्णतेपासून संरक्षण:आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभागाची विशेष नियमावली जारी

**मुंबई:सध्या संपूर्ण महाराष्ट्रात तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे गेला असून, वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाने नागरिकांसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.** विशेषत:लहान मुले,वृद्ध आणि गर्भवती महिलांनी दुपारी घराबाहेर पडताना अत्यंत काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते,शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे चक्कर येणे, मळमळणे आणि तीव्र डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसू शकतात.अशा वेळी तातडीने उपाय करणे गरजेचे आहे.उन्हापासून वाचण्यासाठी नागरिकांनी सुती आणि हलक्या रंगाचे कपडे वापरावेत. तसेच, बाहेर पडताना डोक्यावर टोपी, छत्री किंवा रुमाल ठेवावा.आरोग्य विभागाने सुचवलेले महत्त्वाचे उपाय:दिवसभरात किमान ३ ते ४ लिटर पाण्याचे सेवन करा.लिंबू सरबत, ताक, शहाळे आणि ओआरएस यांसारख्या पेयांचा वापर वाढवा. दुपारी १२ ते ४ या वेळेत थेट उन्हात जाणे टाळा.मद्यपान आणि जादा कॅफीनयुक्त पेये टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी वेगाने कमी होते.राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये 'हिट स्ट्रोक रूम' सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जर एखाद्या व्यक्तीला उन्हामुळे अस्वस्थ वाटत असेल,तर तिला त्वरित सावलीत नेऊन थंड पाण्याने पुसावे आणि जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा,असे आरोग्य संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

## स्वयंपाकघरातील 'हे' ७ पदार्थ कधीच खराब होत नाहीत; योग्य साठवणूक केल्यास वर्षानुवर्षे टिकतील,जाणून घ्या सविस्तर

**पुणे:**आपण बाजारातून विकत घेणाऱ्या बहुतांश खाद्यपदार्थांवर 'एक्स्पायरी डेट' म्हणजेच समाप्तीची तारीख असते. मात्र, आपल्या स्वयंपाकघरात असे काही पदार्थ आहेत, जे योग्य पद्धतीने साठवल्यास अनेक वर्षे, अगदी दशके सुद्धा टिकू शकतात. या पदार्थांची गुणवत्ता आणि पौष्टिक मूल्ये कधीही कमी होत नाहीत.**कधीही खराब न होणारे महत्त्वाचे पदार्थ:१. मीठ:**मीठ हे खाणीतून मिळणारे खनिज असल्याने ते कधीही खराब होत नाही.प्राचीन काळापासून पदार्थ टिकवण्यासाठी मिठाचा वापर केला जातो. फक्त ते ओलाव्यापासून दूर ठेवणे आवश्यक आहे.**२.पांढरा तांदूळ:** संशोधनानुसार,पांढरा तांदूळ ३० वर्षांपर्यंत चांगला राहू शकतो. मात्र,तपकिरी तांदूळ तेलकटपणामुळे लवकर खराब होतो. **३.शुद्ध तूप:**तूप जर हवाबंद डब्यात आणि ओलाव्यापासून दूर ठेवले,तर ते अनेक वर्षे वापरता येते. **४.वाळलेली कडधान्ये:**राजमा,चणे आणि वाटाणा कोरड्या स्थितीत ठेवल्यास वर्षानुवर्षे टिकतात,फक्त जुने झाल्यावर त्यांना शिजण्यास थोडा अधिक वेळ लागतो. **५. व्हिनेगर:** यातील उच्च आम्लतेमुळे व्हिनेगर कधीही खराब होत नाही. लोणचे टिकवण्यासाठी याचा मोठा वापर केला जातो. **६.कॉर्नस्टार्च:**हे पावडर स्वरूपातील घटक ओलाव्यापासून वाचवल्यास कितीही काळ टिकू शकते. **७.व्हॅनिला अर्क:**शुद्ध व्हॅनिला अर्कामध्ये अल्कोहोलचे प्रमाण असल्याने तो कधीही खराब होत नाही, मात्र कृत्रिम अर्काची एक्स्पायरी डेट तपासणे गरजेचे आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते,हे पदार्थ साठवताना फक्त ओलावा आणि हवाबंद डब्याचा वापर या दोन गोष्टींची काळजी घेतल्यास अन्नाची नासाडी टाळता येऊ शकते.

## रुग्णवाहिका सेवेच्या गुणवत्ता मानकांसाठी 'बीव्हीजी'च्या सहकार्याने देशातील पहिलाच मूल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न



**पुणे:भारत सरकारच्या आरोग्य क्षेत्र कौशल्य परिषद आणि 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड' यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णवाहिका सेवा मानांकन निकषांनुसार देशातील पहिलाच "मूल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम" पुण्यात यशस्वीरित्या संपन्न झाला. १३ ते १५ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण उपक्रमात देशभरातील तज्ज्ञ, प्रशिक्षक आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.** देशभरातील रुग्णवाहिका सेवांची गुणवत्ता अधिक सक्षम, परिणामकारक आणि रुग्णकेंद्री करण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून प्रशिक्षित आणि प्रमाणित मूल्यांकनकर्त्यांची फळी तयार करण्यात आली असून, हे मूल्यांकनकर्ते देशातील विविध रुग्णवाहिका सेवांचे परीक्षण करून उच्च दर्जाची सेवा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत. कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे मुख्य अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. प्रसाद राजहंस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपत्कालीन आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता,रुग्ण सुरक्षितता आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्त्व अधोरेखित करत अशा संरचित प्रशिक्षण कार्यक्रमांची गरज स्पष्ट केली. प्रशिक्षित मूल्यांकनकर्त्यांमुळे रुग्णवाहिका सेवांचा दर्जा अधिक उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी भारत सरकारच्या हेल्थ सेक्टर स्किल कौन्सिल रुग्णवाहिका सेवा प्रदाता मानांकन निकष समितीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपत्कालीन वैद्यकीय सेवांमध्ये व्यवहार्य, संवेदनशील आणि परिस्थितीनुरूप मूल्यांकन प्रणालीची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. गुणवत्ता हमी, सातत्यपूर्ण सुधारणा आणि कार्यक्षम प्रतिसाद व्यवस्थेसाठी प्रशिक्षित मूल्यांकनकर्ते अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.तीन दिवसांच्या सत्रांमध्ये रुग्णालयपूर्व आरोग्य सेवांमधील मानकीकरण, कौशल्य विकास, गुणवत्ता सुधारणा, मूल्यांकन प्रक्रिया आणि क्षमता वृद्धी या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. देशातील रुग्णवाहिका आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेमध्ये गुणवत्ता हमी यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.आरोग्य क्षेत्रातील कौशल्य विकास, मानकीकरण आणि गुणवत्ता हमी अधिक सक्षम करण्यासाठी 'बीव्हीजी' सातत्याने कार्यरत असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे देशातील आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला.

adv

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे-१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे-१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion



## राष्ट्रीय चर्मकार महासंघ तथा राजकुमार बडोले फाउंडेशन संयुक्त विद्यमाने उपवर्गीकरण ६ जून रोजी राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**अकोलो:**अनुसूचित जातीत ५९ जातींचा समावेश असून १३ टक्के आरक्षण आहे.याचे उपवर्गीकरण करण्याचे शासनाने ठरवले आहे.यासंदर्भात चर्मकार समाजाची भुमिकी संदर्भात राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी समाज कल्याण मंत्री बबनरावजी घोलप व राजकुमार बडोले फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष माजी समाज कल्याण मंत्री राजकुमार बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत तज्ञ मार्गदर्शक होणार आहे. तसेच पुरण मेश्राम माजी कुलसचिव नागपूर विद्यापीठ डॉ.संदेश वाघ विभाग प्रमुख मुंबई विद्यापीठ प्रा.रोहिदास बनसोडे आमंत्रित पाहुणे दत्तात्रय गोतीषे,लक्ष्मणरावजी घुमरे,संजय खामकर,डॉ.विठ्ठल दांडगे दिनांक ६ जून शनिवार २०२६ दुपारी २ वाजता स्थळ.डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान प्रबोधन नगर खडकी अकोला राजकुमार बडोले फाउंडेशन महाराष्ट्र राज्य निमंत्रक-आयोजक प्राचार्य डॉ.गणेश बोरकर ९४२३८५२०३५८३२९२९४२३५




## पुण्याला देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे:पुणे शहराला देशाचे 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' म्हणून ओळख मिळत असून ती पुढे नेण्यासाठी मेट्रोचे जाळे, रस्त्यांची सुधारणा, भूमिगत बोगद्यांचे जाळे तयार करणे आदी माध्यमातून उत्तम वाहतुकीची व्यवस्था, चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे,उत्तम जीवनशैली सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.** पुणे शहरात हाती घेतलेले प्रकल्प पुढील ३ ते ४ वर्षात पूर्ण झाल्यानंतर देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून ओळखले जावे यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही ते म्हणाले.मोहम्मदवाडी येथील समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या साठवण टाक्यांचे लोकार्पण तसेच मुंढवा येथील महात्मा फुले चौक ते खराडी मेट्रो समवेत दुमजली उड्डाणपुलाचे ऑनलाईन भूमिपूजनासह विविध प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजननिमित्त रहेजा चौक,दोराबजी मॉल जवळ, मोहम्मद वाडी हडपसर येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार योगेश टिळेकर, चेतन तुपे, भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते.पुण्याचा नवीन विमानतळ, नवीन रिंग रोड, हडपसर पासून यवतपर्यंत आधुनिक प्रकारचा उन्नत मार्ग आदी सर्व माध्यमातून पुण्याची जोडणी चांगली करण्याचा प्रयत्न आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, गतवर्षी एकट्या पुण्यात देशातील २५ टक्के जीसीसी तयार झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रानंतर पुढील लाट जीसीसीची असून त्यात पुणे पुढे चालले आहे. ते पुढे नेण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुण्याला एक आधुनिक शहर म्हणून पुढे नेण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. महात्मा फुले चौक ते खराडी हा मेट्रोसह दुमजली पूल उभारण्यात येत असून त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यासह प्रवासातील १५ ते २० वाचणार आहेत. पुण्याला गतिमान करण्याच्या प्रयत्नातील हा एक महत्वाचा पूल आहे. कोंढवा परिसरातील रखडलेल्या कात्रज कोंढवा रस्त्याचे येत्या ६ महिन्यात भूसंपादन होऊन हा रस्ता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले. राज्यात कॅन्सर ग्रीड तयार करण्याचा प्रयत्नदेशातील पहिले पीपीपी तत्वावर दर्जेदार आरोग्य सेवा उभी करता येते हे या कर्करोग उपचार रुग्णालयाच्या उभारणीवरून दिसून येते. राज्यात मोठ्या प्रमाणात कॅन्सर ग्रीड तयार करण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न सुरू आहे. या ग्रीडच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला कॅन्सरवरील आधुनिक उपचार वेळेत आणि अत्यल्प दरात वा मोफत मिळाला पाहिजे असे प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये हे रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.या रुग्णालयात अतिशय आधुनिक अशा गामा स्कॅन, पेट स्कॅन आदींसह उपचार सुविधा सामान्य नागरिकांना केंद्र सरकारच्या सीजीएचएस योजनेप्रमाणे अतिशय अल्प दरात मिळणार आहेत. शासनाच्या सर्व योजना या ठिकाणी मिळणार आहेत. कॅन्सर सारखा आजार वेगाने वाढत असताना त्याचे उपचार प्रदीर्घ व खर्चिक होतात. हे पाहता पुणेकरांसाठी हे रुग्णालय एक वरदान ठरेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.ते पुढे म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज हे बुधभूषण ग्रंथ लिहित आहेत अशा स्वरूपाचे शिल्प छत्रपती संभाजी उद्यान येथे उभारले आहे. ११ भाषा ज्ञात असलेले छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या १४ व्या वर्षी हा संस्कृत ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचा प्रत्यक्ष नमुना आहे. या ग्रंथातील १० श्लोकांचा शिल्पात समावेश केला असून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शहाजी महाराज यांचे व्यक्तिमत्व त्यातून समजण्यास मदत होते.समान पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यातसमान पाणीपुरवठा योजनेंतर्गत आज लोकार्पण झालेल्या पाण्याच्या टाक्यांमुळे दोराबजी पॅराडाईज, महंमदवाडी, एनआयबीएम या सर्व भागात समान पाणी पोहोचणार आहे. २०१५ साली पुण्यात वितरण व्यवस्था चांगली झाली पाहिजे असा आम्ही निर्णय घेतला. पुण्यात देशात सर्वाधिक पाणी वापर दिसत होता. त्याचे कारण ४० ते ५० टक्के पाण्याची गळती होत होती. त्यामुळे समान पाणीपुरवठा योजना राबवून वितरण व्यवस्था अधिक चांगली करण्याचा निर्णय घेतला. त्यातून पाण्याचा नाश टाळून प्रत्येक व्यक्तीपर्यंत पाणी पोहोचवता यासाठी २०१७ साली या योजनेला मान्यता दिली. येथील लोकप्रतिनिधींनीही सतत पाठपुरावा केला. ही योजना हळूहळू अंतिम टप्प्यात चालली आहे याचा आनंद आहे, असेही ते म्हणाले.लोकांना पाणी मिळाले तर जे आशीर्वाद मिळतात त्यापेक्षा मोठे आशीर्वाद कुठलेही नाहीत. उरलेले काम पूर्ण व्हावे यासाठी २ महिन्यात आढावा बैठक घेऊन गती देण्यात येईल. ही योजना पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक पुणेकराला 'रोज पाणी, शाश्वत पाणी, शुद्ध पाणी, सातत्यपूर्ण पाणी' देऊ शकू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. वाढलेली लोकसंख्या, नवीन समाविष्ट झालेल्या गावांसाठी पाणी पुरवठ्यासाठी १२ गावांची पाणीपुरवठा योजना मंजूर करून त्यासाठी ८९० कोटी रुपये दिले. तसेच केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड मधूनही निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून खडकवासला, नांदेड, नांदोशी, किरकिटवाडी, धायरी, जांभूळवाडी, भिलारवाडी आदी भागातही मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.छत्रपती संभाजी महाराजांचे शिल्प स्वराष्ट्राचा अभिमान जागृत करण्याची प्रेरणा देईल- उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवारउपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, शासन आणि खासगी क्षेत्र एकत्र आल्यानंतर जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळतात हे कर्करोग रुग्णालय हे उदाहरण आहे. आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करत आहे.छत्रपती संभाजी महाराज यांचे बुधभूषण ग्रंथ लिहितानाचे शिल्प केवळ पाहण्यासाठी नाही त्यांच्यासारखा कणखर बाणा आणि स्वराष्ट्राचा अभिमान सर्वांमध्ये जागृत करण्यासाठी प्रेरणा देईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर या नऊ टाक्यामुळे येथील जनतेला पुरेशा दाबाने पाणी मिळेल. पाणी हे जीवन असून पाण्याची बचत करणे महत्वाचे आहे असेही त्या म्हणाल्या. मेट्रोच्या पुलामुळे प्रवासाचा वेळ वाचणार असून इंधनाची बचत होणार आहे. कामांच्या गुणवत्तेबरोबरच, भविष्यातील विचार करून नियोजन करण्यावर दिवंगत अजित पवार यांचा भर होता. त्यांच्या भूमिकेनुसार विकास कामे करण्यावर भर दिला जाईल. प्रास्ताविकात महापौर श्रीमती नागपुरे म्हणाल्या, 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' या धर्तीवर 'विकसित पुणे' या संकल्पनेनुसार पुणे शहराला सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी काम सुरू आहे. समान पाणीपुरवठा योजनेतील पाण्याच्या पाण्याच्या टाक्या कार्यान्वित झाल्यामुळे ३ लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा होणार आहे. पुणेकरांच्या वाहतुकीला गती आणि वाहतुकीला अत्याधुनिक रूप देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. खराडी ते महात्मा फुले चौकदरम्यान मेट्रोसह दुमजली पुलामुळे खराडीकरांना मोठा दिलासा मिळणार आहे, असेही त्या म्हणाल्या.आमदार योगेश टिळेकर म्हणाले, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी २०१५ मध्ये २ हजार ८०० कोटी रुपयांची समान पाणीपुरवठा योजना जाहीर करून आता कार्यान्वित केली. म्युनिसिपल बाँड च्या माध्यमातून निधी उभा केला. पुणे आणि हडपसरच्या रस्ते, पाणीपुरवठा, विकासासाठी मुख्यमंत्र्यांनी निधीची उपलब्ध करून दिला.

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रभाग समित्यांची पुनर्रचना;१० क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाला दिले किल्ल्याचे नाव

**पिंपरी:पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनिक कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे,महानगरपालिकेच्या विद्यमान ८ प्रभाग समित्यांचे (क्षेत्रीयकार्यालये) पुनर्रचना करून एकूण १० प्रभाग समित्या (क्षेत्रीय कार्यालये) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.** याबाबत आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आला आहे. प्रभाग समित्यांचे कार्यालयांना किल्ल्यांचे नाव देखील देण्यात आले आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ मध्ये लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रभाग समित्यांची स्थापना करण्याचे प्रावधान आहे.त्या अनुषंगाने प्रशासनिक सोयीसाठी व नागरिकाभिमुख सेवा अधिक परिणामकारकपणे देण्यासाठी महानगरपालिकेच्या विद्यमान ८ प्रभाग समित्यांचे पुनर्रचना करून एकूण १० प्रभाग समित्या स्थापन करण्याबाबत १३ मार्च २०२६ रोजी झालेल्या महापालिका सभेत निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार प्रभाग समित्यांचे पुनर्रचना करून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अन्वये ३२ निवडणूक प्रभागांची विभागणीदेखील प्रभागनिहाय करण्यात आली आहे.प्रभाग समित्यांच्या पुनर्रचनेबाबतचा निर्णय २५ मे २०२६ पासून लागू होणार आहे, असेदेखील आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.क्षेत्रीय कार्यालयाचे नाव, पत्ता व त्या अंतर्गत येणारे प्रभाग क्रमांकअ क्षेत्रीय कार्यालय (राजगड ) - संत ज्ञानेश्वर चौक, निगडी प्राधिकरण, निगडी ४११०४४ - प्रभाग क्र. १३,१४ व १५ब क्षेत्रीय कार्यालय (सिंहगड )-लिंक रोड, एल प्रो कंपनी आवार, चिंचवडगाव ४११०३३ - प्रभाग क्र.१७,१८ व १९क क्षेत्रीय कार्यालय (विजयदुर्ग )-हॉकी स्टेडियम शेजारी, नेहरूनगर, भोसरी ४११०२६ - प्रभाग क्र. २, ९ व १०ड क्षेत्रीय कार्यालय (देवगिरी)-औंध-रावेत रोड, रहाटणी ४११०१७ - प्रभाग क्र. २१, २७, २८ व २९ई क्षेत्रीय कार्यालय (शिवनेरी) - पांजरपोळ संस्थे समोर, नाशिक रोड, भोसरी ४११०३९ - प्रभाग क्र. ३,४ व ५फ क्षेत्रीय कार्यालय (तोरणा) - नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाची जुनी इमारत लोकमान्य टिळक चौक, निगडी ४११०४४ - प्रभाग क्र. १,११ व १२ग क्षेत्रीय कार्यालय (पुरंदर)-नविन प्रशासकिय इमारत, दिलिप वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमी मागे थेरगाव, पुणे-३३ - प्रभाग क्र. २२,२३ व २४ह क्षेत्रीय कार्यालय (प्रतापगड) - कासारवाडी येथील महिला आय.टी.आय इमारत - प्रभाग क्र. ३०,३१ व ३२ज क्षेत्रीय कार्यालय (रायगड)- स.नं २७, मनपा वाहनतळ इमारत, ताथवडे, पुणे ४११ ०३३ - प्रभाग क्र. १६,२५ व २६ल क्षेत्रीय कार्यालय (लोहगड)- म्हाडा, प्लॉट नं ई-२, संत तुकाराम नगर, पोलिस स्टेशन समोर, पिंपरी पुणे ४११ ०१८ - प्रभाग क्र. ६,७,८ व २०

## टाळगाव चिखलीतील टाऊन हॉलला 'जगदगुरू संत तुकाराम महाराज' यांचे नाव



**पिंपरी:**-टाळगाव चिखली येथील टाऊन हॉलला "जगदगुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" असे नामकरण करण्याच्या उपसूचनेस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेत मंजुरी देण्यात आली.महापौर रवि लांडगे यांनी या उपसूचनेला मंजुरी दिली.

टाळगाव चिखली हे गाव संत परंपरेशी निगडित असून,या परिसरास जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे.संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीतील समता,मानवता आणि भक्तीभावाचा प्रभाव आजही परिसरातील सामाजिक व धार्मिक वातावरणात दिसून येतो.महासभेत मंजूर झालेल्या यउपसूचनेनुसार,टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल आता "जगदगुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" या नावाने ओळखला जाणार आहे.स्थानिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.ही उपसूचना भाजपा नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी मांडली होती,तर नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी अनुमोदन दिले होते.महासभेने या प्रस्तावास मंजुरी दिल्याने गावाच्या सांस्कृतिक ओळखीला नवा सन्मान मिळाला आहे.आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा टाऊन हॉल उभारण्यात आला. त्याला स्थानिक लोकप्रतिनिधींची साथ मिळाली. आता तुकोबांच्या नावाने हे संकुल ओळखले जाईल,याचा मनोमन आनंद आहे." कुंदन गायकवाड, नगरसेवक, भाजपा यांनी सांगितले आहे.

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत
वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

## उद्यानात उभारण्यात येणारे विरंगुळा केंद्र सामाजिक संवादासाठी व्यासपीठ ठरेल-महापौर रवि लांडगे

**पिंपरी:पिंपरी चिंचवड शहरातील उद्याने ही शहराचा श्वास आहेत. इतर शहरांच्या तुलनेत आपल्या शहरात अधिक उद्याने असून,त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. उद्यानांमध्ये उभारण्यात येणाऱ्या विरंगुळा केंद्राच्या माध्यमातून सर्व वयोगटातील नागरिकांना एकत्र येण्यासाठी,व्यायाम,सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक संवादासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे,असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी येथील देऊबाई कापसे उद्यान परिसरात बहुउद्देशीयदोन मजली विरंगुळा केंद्राच्या कामाचे भूमिपूजन आज महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहातपार पडले. यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर,नगरसदस्य कुशाग्र कदम, तुषार हिंगे,अनुराधा गोरखे, सुप्रियाचांदगुडे, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ नागरिक,सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते.महापौर रवि लांडगे म्हणाले की,पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून शहरातील उद्यानांचेआधुनिकीकरण आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यावर विशेष भर दिला जात आहे. याउपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळून त्यांच्या जीवनमानातसकारात्मक बदल होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.कापसे उद्यानात उभारण्यात येणाऱ्या दोन मजली विरंगुळा केंद्रासाठी ६ लाख ५३ हजार रुपये खर्चयेणार असून या कामाची मुदत ८ महिन्यांची आहे. विरंगुळा केंद्र १८ मीटर बाय ८ मीटर असे एकूण२८८ चौरस मीटर परिसरात असणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली, कार्यक्रमाचेसूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# महसूल विभागाच्या विशेष मोहिमेद्वारे पाणंद रस्ते, सीमांकन मोजणी व जमीन नोंदी व्यवस्थेला गती देणार : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे





**नाशिक:ग्रामीण भागातील पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करणे,सीमांकन मोजणीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे तसेच जमीन नोंदी व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी महसूल विभागामार्फत राज्यभर विशेष मोहीम राबवून गती देणार असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले**.निफाड तालुक्यातील पिं-पळगाव बसवंत येथे आयोजित शिबिरात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. यावेळी आमदार दिलीप बनकर,पिंपळगाव बसवंत चे नगराध्यक्ष डॉ.मनोज बर्डे,ओझर नगराध्यक्षा अनिता घेगडमल, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सहाय्यक जिल्हाधिकारी पवन दत्ता, उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक महेश इंगळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, तहसीलदार (सामान्य शाखा) प्रदीप वर्पे यांच्यासह नागरिक, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होतेमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, पाणंद रस्ते हे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती विकासाचा महत्त्वाचा घटक असून शेतीमाल वाहतूक, सिंचन सुविधा आणि गावातील दळणवळण सुरळीत ठेवण्यासाठी अतिक्रमण हटवून रस्ते कायमस्वरूपी मोकळे ठेवण्यावर भर देण्यात येणार आहे. आवश्यक ठिकाणी सीमांकन मोजणी करून रस्त्यांची रुंदी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. मोजणी विभागावरील वाढता ताण लक्षात घेऊन परवानाधारक खासगी सर्वेअर (लायसन्सी सर्वे अर) यांची मदत घेण्याबाबत सकारात्मक भूमिका शासनाने स्वीकारली असून मोजणीची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येणार आहे. ड्रोन सर्वेक्षण, डिजिटल भू-नकाशे आणि ऑनलाइन नोंद प्रणालीद्वारे जमीनविषयक सेवा अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भातील वाद कमी करण्यासाठी लँड टायटल व्यवस्थेला अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने आवश्यक कायदे व नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. ग्रामीण भागातील विकासकामे, रस्ते, सिंचन आणि महसूल विषयक प्रकरणे प्राधान्याने मार्गी लावून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देशही मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले.शेतकरी हा केंद्रबिंदू मानून विविध योजनांच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम आणि शाश्वत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, नैसर्गिक संकटांचा सामना करतानाही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे आमदार श्री. बनकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. उपविभागीय अधिकारी डॉ.मंगरुळे यांनी प्रास्ताविकातून महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती यावेळी दिली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महसूल मंत्री श्री बावनकुळे यांच्या हस्ते विविध महसूल सेवा देणाऱ्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले तसेच विविध शासकीय योजनांचे लाभ व दाखल्यांचे वाटप प्रतिनिधी स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

# टाळगाव चिखली प्रभाग क्रमांक १ मधील इंदिरागांधी उद्यानाला दिवस-रात्र सुरक्षारक्षक महापलिकेने ठेवावा




**चिखली:**टाळगाव चिखली प्रभाग क्रमांक १ मधील पाटील नगर येथील व इंदिरागांधी नगर येथील असलेल्या इंदिरागांधी उद्यान हे पिंपरी चिं-चवड महानगरपालिकेच्या वतीने येथील महापालिकेचा कर भरनारे नागरिक यांच्या उत्तम आरोग्यासाठी व उद्यानामध्ये बसण्यासाठी स्थापित केला आहे.

या उद्यानामध्ये नागरिकांची वरदळ वाढत असून इंदिरा गांधी उद्यानाचा पाहिजे त्या प्रमाणात नागरिकांना लाभ मिळत नसून उद्यानामधील नागरिकांसाठी असलेला वॉकींग ट्रक फुटपाथ यांचे काम रखडले असून तसेच तसेच उद्यानाला दिवसा व रात्री वाचमेन नसल्यामुळे उद्यानामध्ये भटकी कुत्री मोठया प्रमाणात येत असतात तसेच त्यामुळे परिसर अस्वच्छ होत असतो.

तसेच रात्रीच्या वेळी काही मद्यपी व्यक्ती उद्यानामध्ये येत असून परिसरातील नागरिक ही त्यामुळे असुरशिक्षित झाल्याचे येथील नागरिकांनी सांगितले आहे.

तसेच उद्यानापरिसरात सीसीकॅमेरा नाही तसेच याबाबत उद्यानविभागातील संबधीत अधिकारी व नगरसेवक यांना ही याबाबत सुचना माहिती येथील नागरिकांनी दिली असल्याचे सांगितले आहे.तरी महापालिकेच्या संबधित विभागातील अधिकारी व नगरसेवक यांनी इंदिरा गांधी उद्यानाची शुशोभीकर व दिवस रात्र सुरक्षारक्षक ठेवण्यात यावा की ज्या मुळे उद्यानमधील झाडे व परिसर तसेच नागरिकांसाठी असलेल्या व्यायाम साहित्यांची सुरक्षा ठेवली जाईल.

# लोणावळा येथे भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र आयोजित 'पं. दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान कार्यक्रम संपन्न

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com




**पुणे:लोणावळा येथे भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र आयोजित 'पं.दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६'अंतर्गत पार पडलेल्या मार्गदर्शन सत्रात विविध विषयांवरील सत्रांमधून संघटनात्मक बांधणी,पक्षाची वैचारिक भूमिका आणि नेतृत्व कौशल्य याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले.**

'शतप्रतिशत भाजपा'चा विचार घराघरांत पोहोचवा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन यावेळी केले. कार्यकर्त्यांनी समाजाशी अधिक प्रभावी नाते निर्माण करत विच-ारधारा जनतेपर्यंत पोहोचवावी, हा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला."भाजपा इतिहास" या विषयावर भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा विधानपरिषद आमदार सु-नीलजी कर्जतकर यांनी पक्षाच्या स्थापने पासूनच्या प्रवासाचा प्रेरणादायी आढावा घेतला. पक्षाची वैचारिक वाटचाल,संघटन विस्तार आणि जनसामान्यांशी जोडले गेलेले नाते याविषयी त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या सत्रामुळे पक्षाच्या कार्यपद्धतीकडे अधिक व्यापक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली.

या वेळी जिल्हा प्रभारी भरतजी पाटील,शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे,अनुप मोरे प्रदेश अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र राज्य,आमदार शंकर जगताप,आमदार उमाताई खापरे,आमदार अमित गोरखे,माजी आमदार अश्विनीताई जगताप, सरचिटणीस मोरेश्वर शेंडगे,मधुकर बच्चे,विकास डोळस,भाजपाचे जेष्ठ राजेश पिल्ले,वैशाली खाडये,महिला मोर्चा शहराध्यक्ष श्रीमती सुजाताई पलांडे,युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्यासह इतर सहकारी आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# पीसीयू मध्ये फिडेल सॉफ्टटेक द्वारे स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब सुरू-ज्ञानेश्वर लांडगे

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com



**पिंपरी:विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांसोबत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण प्रणाली मध्ये उदयोन्मुख तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करून विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. त्या अंतर्गत स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅबची स्थापना करण्यासाठी फिडेल सॉफ्ट टेक सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार एआय सक्षम विद्यापीठ बनण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी दिली**.आकुर्डी येथील ट्रस्ट कार्यालय मध्ये पीसीयू आणि फिडेल सॉफ्टटेक कंपनी यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला.यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे उपाध्यक्ष पद्माताई भोसले,सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील,उद्योजक नरेंद्र लांडगे,अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई,आयटी आणि आयटीइएस विभाग प्रमुख प्रा.रामकृष्ण वडाली आणि फिडेल सॉफ्टटेक लि. चे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी खजिनदार शांताराम गराडे यांनी सांगितले की,पीसीयू मध्ये लवकरच फिडेल सॉफ्टटेक द्वारे स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब सेंटर सुरू होईल.विद्यार्थ्यांना प्रकल्प आणि उद्योग संबंधित साधनांद्वारे डेटा ॲनालिटिक्स, डेटा इंजिनिअरिंग आणि बिझनेस इंटेलिजन्समध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. यात तज्ञांचे मार्गदर्शन, प्रशिक्षण,प्रात्यक्षिक, असाइनमेंट्स,मूल्यांकन आणि प्रमाणपत्रे यांचा समावेश आहे.या लॅब मुळे विद्यार्थ्यांना डेटा ॲनालिटिक्स, डेटा इनजेशन आणि इटीएल(एक्स्ट्रॅक्ट, ट्रान्सफॉर्म,लोड)प्रक्रिया, प्रेडिक्टिव्ह मॉडेलिंग आणि एआय मधील उच्च मागणी असलेल्या करिअरसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल असेही शांताराम गराडे यांनी सांगितले.स्वागत प्रा.रामकृष्ण वडाली आणि आभार ओ. एस.डी.डॉ.योगेश भावसार यांनी मानले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन हे केवळ आर्थिक नव्हे,तर राष्ट्रीय जबाबदारीचे प्रतीक-कामगारनेते यशवंत भोसले



**पिंपरी:**जगामध्ये सध्या सुरु असलेल्या आखाती युद्धामुळे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत असून, त्याची झळ भारतासारख्या विकसनशील देशांनाही बसत आहे. कच्च्या तेलाचे वाढते दर,मजबूत होत चाललेला अमेरिकन डॉलर, रुपयाची घसरण आणि आयात खर्चातील वाढ यामुळे भारतातील महागाई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहिताच्या दृष्टीने नागरिकांना सोने-चांदी खरेदी, पेट्रोल-डिझेल वापर तसेच खाद्यतेल वापरामध्ये संयम राखण्याचे केलेले आवाहन हे केवळ आर्थिक नव्हे तर राष्ट्रीय जबाबदारीचे प्रतीक असल्याचे मत राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केले.पिंपरी येथे पत्रकार परिषदेत (दि.१३)ते बोलत होते.

यावेळी बोलताना कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की,भारत हा कच्च्या तेलासाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे,खाद्यतेलासाठी परदेशी बाजारावर अवलंबून आहे, तसेच सोन्याची आयात मोठ्या प्रमाणात करतो.युद्धजन्य परिस्थितीत डॉलर मजबूत झाल्यास रुपयाची किंमत कमी होते,आयात महाग होते,पेट्रोल-डिझेल दर वाढतात, वाहतूक खर्च वाढतो, शेती उत्पादन खर्च वाढतो,आणि शेवटी सामान्य नागरिकांवरील महागाईचा भार वाढतो.याचा सर्वाधिक परिणाम मजूर वर्गावर,शेतकरी बांधवांवर, मध्यमवर्गीय कुटुंबांवर,लघुउद्योग आणि छोट्या व्यावसायिकांवर होतो. डिझेल महाग झाल्यास ट्रॅक्टर पंप, शेती मशागत खर्च वाढतो. मालवाहतूक महाग होते. भाजीपाला व जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढतात. पेट्रोल-डिझेल वापरामध्ये संयम, अनावश्यक खरेदी टाळणे, स्थानिक उत्पादनांचा वापर वाढवणे आणि देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी सहकार्य करणे ही आज काळाची गरज आहे. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे मत स्पष्ट आहे की, देश आर्थिकदृष्ट्या मजबूत राहिला तरच मजूर, शेतकरी आणि सामान्य नागरिक सुरक्षित राहतील. त्यामुळे ही केवळ सरकारची लढाई नसून प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारने इंधनावरील कर कमी करणे, आवश्यक वस्तूंवरील नियंत्रण मजबूत करणे, कामगार व शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे, रोजगारनिर्मिती वाढवणे, या बाबींवरही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. आज भारत एका आर्थिक आव्हानात्मक टप्प्यावर उभा आहे. या काळात संयम, राष्ट्रीय एकात्मता आणि आर्थिक शिस्त या माध्यमातून आपण देशाला अधिक सक्षम बनवू शकतो असे मत कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते 'अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रा'चे नामकरण



**पुणे:अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण करताना शाश्वत विकासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून बळकटीकरण करावे. देशी गायीचा प्रचार व प्रसार होण्याच्यादृष्टीने पुशपालकांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून देशी गायींचे मोठ्या प्रमाणात जतन व संवर्धन करण्याचे काम करावे,राज्यातील शेतकरी, पशुपालक आणि विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केल्या**.यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार,महात्मा फुले कृषी विद्यापीठ कुलगुरू डॉ. विलास खर्चे,महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर आदी उपस्थित होते.महात्मा फुले कृषी विद्या-पीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, येथे कार्यरत असलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे "अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र" असे नामकरण करण्यास राज्य शासनाने मान्यता देण्यात दिली होती;त्यानुसार आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते नामकरण फलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी केद्रांच्या नुतन इमारतीच्या विकास कामाची पाहणी केली,यावेळी त्या बोलत होत्या.